# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त डी विभाग यांचे कार्यालय, जोबनपुत्रा आवार, नानाचौक, ग्रँटरोड (प), मुंबई- 400 007.

क्र.: सआडी/ २६७० /सअ(परि) पूर्व दिनांक: ०१/०९/२०२६

**स्थळ दरपत्रिका सूचना**

विषय :- गणपती विसर्जन २०२६ करिता ऑगस्ट क्रांति मैदान येथे मंडप/शामियाना विद्युत व्यवस्थेसह उभारणे...

गिरगांव चौपाटी येथील गणपती विसर्जन सोहळ्यात दरवर्षी वाढणा-या गणेश मुर्तीच्या संख्या, तसेच भाविकांची वाढती गर्दी व मा. उच्च न्यायालयाने पारीत केलेले आदेशाच्या अनुषंगाने गणेश विसर्जन सोहळा निर्विघ्नपणे पार पाडण्याकरीता गणपती विसर्जन २०२६ करिता ऑगस्ट क्रांति मैदान येथे मंडप/शामियाना विद्युत व्यवस्थेसह तातडीने उभारणे आवश्यक आहे.

परंतु सदर कामाचा आवाका व त्याकरिता उपलब्ध असलेला कालवधी लक्षात घेता, सदरची कामे पूर्ण करण्यासाठी प्रचलित निविदा प्रक्रियेचे अवलंबन करणे शक्य नसल्याने तसेच सदर सेवा GEM Portal वर उपलब्ध नसल्याने तसेच सदर कामाची तातडी, महत्व व कमी असलेला कालावधी विचारात घेता व प्रस्तावित काम कालबद्ध वेळेत पूर्ण करावयाचे असल्याने सदरहु कामाकरिता खुल्या बाजार भावाच्या दरानुसार लघुत्तम बजेटरी ऑफरच्या आधारे खालील नमूद कामाकरिता आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांजकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तीन दिवशीय सूचना प्रदर्शित करून सिलबंद दरपत्रिका मागविण्यात येत आहे.

| कामाचा तपशिल | जॉब |
|---|---|
| गणपती विसर्जन २०२६ करिता ऑगस्ट क्रांति मैदान येथे मंडप/शामियाना विद्युत व्यवस्थेसह उभारणे | ०१ |

देय दिनांक ०३/०९/२०२६ व वेळ दुपारी ३.०० वाजेपर्यंत

सहाय्यक अभियंता (परि) पूर्व डी विभाग यांच्या कार्यालयात उपरोक्त दिवशी नियत वेळेपर्यंत सिलबंद दरपत्रिका जमा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

-सही-

सहाय्यक अभियंता (परि) डी विभाग